# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:22.03.2025** **वार:शनिवार**

---

1. गेल्या दहा वर्षात सरकारनं देशाची सुरक्षाव्यवस्था मजबूत केली-केंद्रिय गृहमंत्र्यांचं संसदेत प्रतिपादन
2. 2025-26 या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प विधिमंडळात मंजूर
3. महाराष्ट्र मोटार वाहन सुधारणा विधेयक विधानपरिषदेत सादर आणि
4. खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत राज्यातल्या खेळाडूंनी पटकावली तीन सुवर्णपदकं

**<u>संसद</u>**

राजकीय इच्छाशक्ती आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने गेल्या दहा वर्षात सरकारनं देशाची सुरक्षाव्यवस्था मजबूत केली आहे असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितलं. शहा यांनी काल राज्यसभेत गृह मंत्रालयाच्या कामकाजाबाबतच्या चर्चेला उत्तर दिलं. जम्मू काश्मीरमध्ये दहशतवादामुळे झालेल्या मृत्यूंची संख्या 70 टक्क्यांनी कमी झाली असून पुढच्या वर्षी मार्च महिन्यापर्यंत नक्षलवाद नष्ट होईल असं शहा म्हणाले. जम्मू काश्मीरमधला दहशतवाद, नक्षलवाद आणि ईशान्येकडील भागातील घुसखोरी या तिनही आव्हानांचा सामना सरकारनं अत्यंत निश्चयपूर्वक केल्याचं त्यांनी सांगितलं. घटनेतील 370 वं कलम रद्द करुन सरकारनं एक ध्वज एक राज्यघटना हे घटनाकारांचं स्वप्न पूर्ण केलं आहे असं प्रतिपादन शहा यांनी केलं.

कृषी क्षेत्र हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे आणि शेतकऱ्यांच्या कल्याणाला सरकारचं सर्वोच्च प्राधान्य आहे असं केंद्रिय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. कृषी मंत्रालयाशी संबंधित अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना ते काल संसदेत बोलत होते. गेल्या दहा वर्षात सरकारनं अर्थसंकल्पात कृषी मंत्रालयासाठी 10 लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक तरतूद केली असल्याची माहिती त्यांनी दिली. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत 80 कोटींपेक्षा जास्त लाभार्थ्यांना गहू आणि तांदूळ मोफत दिले जात असल्याचं चौहान यांनी सांगितलं.

**<u>विधीमंडळ कामकाज</u>**

2025-26 या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी काल मंजूर केला. विधानसभेत अर्थसंकल्पातल्या अनुदानाच्या विभागवार मागण्यांवर चर्चा झाली आणि त्या मंजूर झाल्या. त्यानंतर अर्थमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्र विनियोजन विधेयक सादर केलं आणि ते सभागृहानं एकमतानं मंजूर केलं. विधान परिषदेनेही या विधेयकाला मान्यता दिली.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी महाराष्ट्र मोटार वाहन सुधारणा विधेयक विधानपरिषदेत मांडलं. राज्यात लवकरच पार्किंग धोरण आणलं जाईल, स्कूल बस मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावले जातील, असं त्यांनी सांगितलं. मोटार वाहन कायद्यात सुसूत्रता आणणं, वाहनांच्या वजनावर आधारित कर आकारणी ऐवजी वाहनांच्या किंमतीवर आधारित कर आकारणी करणं, तसंच मोटार वाहन कराचे दर वाहनांच्या सध्याच्या बाजारमूल्याशी सुसंगत ठेवण्यासाठी कराच्या कमाल मर्यादेत वाढ करण्याची तरतूद या विधेयकात आहे, असं परिवहन मंत्र्यांनी सांगितलं. या विधेयकावर अभिजित वंजारी, सत्यजित तांबे, अनिल परब इत्यादी सदस्यांनी आपल्या सूचना मांडल्या. सदस्यांनी केलेल्या सूचनांसह हे विधेयक विधानसभेत पाठवण्यात आलं.

दाओसमध्ये झालेल्या करारांमुळे राज्यात 16 लाख रोजगार निर्मिती होणार असून, त्यादृष्टीनं राज्य सरकार या करारांची चोख अंमलबजावणी करेल, अशी ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. या करारांच्या अंमलबजावणीबाबत विरोधकांनी केलेले आरोप त्यांनी फेटाळून लावले.

राज्यात ग्रामीण भागात स्टार्टअपला अधिक प्रोत्साहन देण्यासाठी नेक्स्ट डोअर स्टार्टअप योजना सुरू केली जाणार आहे, याअंतर्गत 1 लाख नवे स्टार्टअप सुरू करण्याचं उद्दिष्ट समोर ठेवलं असल्याचं, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितलं. रायगड जिल्ह्यात महाड इथं बारा बलुतेदारांसाठी विश्वकर्मा भवन सुरू करणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.

राज्यातल्या देवस्थान इनाम जमिनी, कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावे करण्यासाठी महसूल विभागाच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली. या समितीत आणखी तज्ञांचा समावेश केला जाईल, आणि समितीनं दिलेल्या अहवालानुसार विधीमंडळात विधेयक मांडलं जाईल असं त्यांनी सांगितलं.

राज्यातल्या अपूर्ण राहिलेल्या धरणांची कामं पूर्ण करण्यासाठी प्राधान्यक्रम ठरवला जाईल असं जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी, उत्तम जानकर यांनी मांडलेल्या लक्षवेधीला उत्तर देतांना सांगितलं.

**शपथविधी**

विधान परिषदेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी काल झाला. चंद्रकांत रघुवंशी, दादाराव केचे, संजय केणेकर, संजय खोडके, संदीप जोशी यांना सभापती राम शिंदे यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाला सदस्यांचा परिचय करून दिला.

**मुख्यमंत्री**

राज्य सरकारचं काम बँकांसाठी आश्वासक ठरत असून पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सर्व बँकांनी नेहमीच सहकार्य केल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाची आढावा बैठक काल फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली, त्यावेळी ते बोलत होते. सर्व बँकांकडून या महामंडळाला 25 हजार 875 कोटी रुपयांचं अर्थसहाय्य प्राप्त झालं असल्याची माहिती त्यांनी दिली.

**देवगड हापूस-सिंधुदुर्ग**

देवगड हापूस आंब्याच्या नावानं बाजारात होणारी तोतयागिरी आणि बनावट आंब्याची विक्री रोखण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेन यावर्षीपासून प्रत्येक देवगड हापूस आंब्यावर टॅम्परप्रूफ यूआयडी सील सक्तीचं करण्याचा निर्णय घेतला आहे. ऐकूया याविषयीची अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

***सिंधुदुर्ग जिल्ह्यातली देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्था ही हापूसच्या भौगोलिक टॅगची नोंदणीकृत प्रोप्रायटर असलेली संस्था आहे. संस्थेच्या वतीने यावर्षीपासून हापूस आंब्यावर टॅम्परप्रूफ सील युनिक कोड अर्थात यूआयडी कोड लावण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. या नवीन पद्धतीनुसार प्रत्येक अस्सल हापूस आंब्यावर हा यूआयडी स्टिकर लावणं बंधनकारक होणार आहे. त्यामुळे बाजारात होणाऱ्या बनावट हापूस आंब्याच्या विक्रीवर अंकुश येणार आहे. ग्राहकांना केवळ देवगड अस्सल हापूस आंब्याची विक्री व्हावी यासाठी देवगड तालुका आंबा उत्पादक संस्थेन हे पाऊल उचलल आहे. सध्या देवगड हापूस या नावान विकले जाणारे 80 टक्के पेक्षा जास्त आंबे देवगड मधले नाहीत आणि त्यामुळे शेतकऱ्यांना मोठं आर्थिक नुकसान सहन करावं लागतंय, हे लक्षात घेत सहकारी संस्थेन हि पद्धत लागू केली आहे. त्यामुळे प्रत्येक अस्सल हापूस आंब्यावर यापुढे स्टिकर असेल आणि ग्राहक व्हाट्सअपवर फोटो पाठवून शेतकऱ्याची माहिती सहज तपासू शकतील. या पद्धतीमुळे देवगड हापूस आंब्याच्या जीआय अर्थात जिओग्राफिकल***

*इंडिकेशन नोंदणीला देखील संरक्षण मिळेल. तसंच जीआय कायदा 1999 आणि भारतीय न्याय संहिता 2023 नुसार बनावट विक्रेत्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल. आता पर्यंत एक कोटी स्टिकर्स तयार करण्यात आले असून देवगडमधल्या 308 शेतकऱ्यांनी 50 लाखाहून अधिक स्टिकर्स घेतले आहेत. अशाप्रकारे देवगड हापूस आंब्याची अस्सलता आणि गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी उचललेलं हे महत्त्वाचं पाऊल मानलं जातंय. आकाशवाणी बातम्यांसाठी सिंधुदुर्गहून निलेश जोशी.*

**<u>पुणे शालेय वाहतूक</u>**

विद्येचं माहेरघर असलेल्या पुण्यातलं शालेय विद्यार्थ्यांच्या अपघातांचं प्रमाण कमी करण्यासाठी पुणे महापालिकेनं विशेष प्रकल्प सुरू केला आहे. यामध्ये शाळा परिसरात वाहनांचा वेग कमी करण्यासाठी रस्त्यावर चिन्हांकित आकृती काढण्यात येत आहेत. याबाबत आकाशवाणीला अधिक माहिती देताना महापालिकेचे वाहतूक नियोजन अधिकारी निखिल मिजार म्हणाले.....

*या योजनेअंतर्गत पुण्यातील विद्यार्थी किंवा शाळेत जाणारी जी मुलं आहेत, त्यांच्या सुरक्षिततेसाठी आपण त्यांच्या इथल्या रस्त्यांवरती ग्राफिक पद्धतीने रंगीत पॅटर्न्स, ट्रॅफिक कामिंग, साइलेजेस असे सगळे उपाय करत आहोत, जेणेकरून विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे शाळेत जाता येईल किंवा तिथला रस्त्यावरचा वाहनांचा वेग कमी होईल, हा असा उपक्रम करणारी पुणे महानगरपालिका ही देशातील पहिलीच महानगरपालिका आहे, आणि शाळेतल्या विद्यार्थ्यांचा प्रवास हा सुखकर आणि सुरक्षित व्हावा आणि इंडिपेंडंट व्हावा, यासाठी हे उपाय करणं अत्यंत गरजेचं आहे. विद्यार्थ्यांचा अपघातामध्ये हानी होण्याचं प्रमाण सर्वात जास्त आहे शहरात आणि जे अतिशय आपल्या शहरासाठी दुर्भाग्य आहे, तर त्याच्यामुळं ते सुधारणा करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचे अपघात कमी करण्यासाठी आपण कार्यरत आहोत.*

**<u>दत्तक योजना</u>**

पुणे जिल्हा कुपोषणमुक्त करण्यासाठी जिल्हा परिषद 'दत्तक बालक योजना' राबवणार आहे. या योजनेंतर्गत सरकारी अधिकाऱ्यांना बालकं दत्तक देऊन त्यांच्या आरोग्याची जबाबदारी सोपवली जाणार आहे. पुणे जिल्ह्यातील सुमारे दोन लाख 80 हजार बालकांची आरोग्य तपासणी केल्यानंतर त्यात 375 बालकं कुपोषित आढळून आली आहेत. आंबेगाव आणि जुन्नर तालुक्यात सर्वाधिक कुपोषित बालकं आढळली आहेत.

**<u>खेलो इंडिया</u>**

नवी दिल्ली इथं सुरू असलेल्या खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत काल महाराष्ट्राच्या खेळाडूंनी 3 सुवर्ण पदकं आणि 1 रौप्य पदक मिळवलं. अकोल्याच्या चैतन्य पाठकनं 100 मीटर धावण्याच्या शर्यतीत, तर कराडच्या साहिल सय्यद आणि पुण्याच्या सिध्दी क्षीरसागरनं गोळाफेकीत सुवर्णपदक पटकावलं. मीनाक्षी जाधव हिनं गोळाफेकीत रौप्यपदक मिळवलं. बॅडमिंटनमध्ये आरती पाटील आणि सुकांत कदम यांनी आपापल्या गटात अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासांत मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकणात हवामान कोरडं राहील. विदर्भात काही ठिकाणी वादळी वाऱ्यांसह गारा पडण्याची शक्यता असल्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.